**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती, सभा क्रमांक :-१९**
**सन.२००६-२००७**

विषय क्रमांक -१ दिनांक १७/२/२००७

ठराव क्रमांक -१ दिनांक १७/२/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या विविध ठिकाणच्या पाणी पुरवठा योजना / कामे या करिता लागणारे सी.आय./डी .आय. इत्यादी पाईप महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या दर करार असलेल्या पुरवठादार संस्थे कडून खरेदी करणेच्या धोरणात्मक निर्णयास मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट आदेशार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** मा.सादर,

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट करण्यात येतो की, महानगरपालिके मार्फत महानगरपालिका हद्दीत विविध ठिकाणी पाणी पुरवठा योजना राबविण्याची कामे प्रगती पथावर असुन याच कामाकरिता जाहीर निविदा प्रसिध्द करण्यात आलेल्या होत्या. या निविदामध्ये आलेले दर हे अंदाज पत्रकीय दरापेक्षा सर्व साधारण पणे ३५ ते ४० % ज्यादा येतात. जास्तीच्या दराने या बाबत संबधीत पुरवठादार यांचेशी वाटाघाटी करूनही हे दर २० % जास्तीच्या दरापेक्षा कमी करण्यास पुरवठादार तयार नाहीत.

या जास्तीच्या दराने कामे केल्यास म.न.पा.ची आर्थिक नुकसान होण्याचा संभव आहे. सदरचे दर सन -२००५-२००६ व सन -२००६-२००७ चे दरसुची पाहता अवाजवी आहेत. परिणामी पाणी पुरवठा योजनांची कामे ब-याच कालावधी पासुन रखडलेली आहेत.

यास्तव याबाबत मा.आयुक्त, मा.उपायुक्त यांचेशी चर्चा केली असता ही कामे मार्गी लागणेकरीता लागणारे साहित्य (उदा. पाईप्स) हे महानगरपालिके मार्फत थेट खरेदी करून पाणी पुरवठा संदर्भातील कामे मार्गी लावणे शक्य आहे का? असे निर्देश मा.आयुक्त सो. यांनी दिले असता पाईप खरेदीकामी मा.शासनाच्या विविध खात्याकडील दरकरार उपलब्ध असणे बाबत चौकशी केली असता काही शासकीय संस्थाकडे(MSSIDC/ MJP)सी.आय.पाईपचे दर तर काही शासकीय संस्थाकडे (MSSIDC/ MJP) डि.आय.पाईपचे दरकरार मंजूर आहेत.

महाराष्ट्र जिवन प्राधिकरण कोकण भवन, मुंबई यांचा संपूर्ण महाराष्ट्रा करिता डी.आय.पाईप पुरविणे बाबतचा दरकरार जिंदाल सॉ.मिल लिमिटेल, नवी दिल्ली, या कंपनीशी झालेल्या आहे. सदर दर-कराराची मुदत दि.८/११/२००६ पर्यत असुन पुढील ६ महिन्याकरिता सदरच्या दर-करारास मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

वरील सर्व वस्तुस्थिती पाहता महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान टाळणेच्या दृष्टीकोनातून पाणी पुरवठयाचे विविध योजनांसाठी / कामांसाठी लागणारे पाईप व तद्नुषंगाने साहित्य मा.शासनाच्या विविध संस्थेच्या दरकरार प्राप्त संस्थेकडून थेट खरेदी करून महानगरपालिके मार्फत अथवा खाजगी संस्थेकडून खोदाई, जोडणी करून घेता येतील. व पाणी पुरवठा कामे मार्गी लागतील.

तरी म.न.पा. च्या पाणी पुरवठा योजना / कामे मार्गी लावणे कामी पाईप व तद्नुषंगाने साहित्य थेट मा. शासनाच्या विविध संस्थाच्या दर- करार असलेल्या संस्थेकडून खरेदी करणेच्या धोरणात्मक निर्णयास मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेस्तव ऑफीस रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे शाखा अभियंता यांचा अहवाल असे.

शहरअभियंता.श्री. एन.बी.मगर:-अहवालाप्रमाणे पाणी पुरवठा विभागाकडील विविध जल वाहिनी टाकण्याच्या कामासाठी मा.शासनाच्या विविध संस्थांशी असलेल्या दर- कराराप्रमाणे संबधीत संस्थेकडून आवश्यक पाईप व तद्नुषंगाने साहित्य थेट खरेदी करण्याच्या निर्णयास्तव सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे निर्णयास्तव सादर करणे योग्य वाटते. दि. १४/०२/२००७

अं.ले.परिक्षक .:- सादर, प्रस्तावीत बाब अत्यावश्यक सेवेतील तसेच तातडीचे स्वरूपाची असलेमुळे शहर अभि. यांचे कडील प्रस्तावा प्रमाणे मान्यता देणेस हरकत नाही. दि. १४/०२/२००७

मा.उपायुक्त साहेब (सा) :- शासनाच्या विविध विभागांचे दर करार करतांना शासनाच्या वेळोवेळीच्या निर्देशांचे पालन करूनच दरकरार केले जातात. महानगरपालिकेची पाणी पुरवठा व ड्रेनेज लाईनची कामे करण्यासाठी अंदाजपत्रकेही महाराष्ट्र जीवन प्राशिक्षणाच्या दर-सुचीनुसारच केले जातात. त्यामुळे उक्त प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर ठेवणे हरकतीचे नाही. आदेशार्थ सादर. यासाठी स्थायी समिती ची त्वरीत बैठक घेण्याचे निदेश देणेही योग्य राहील. दि. १४/०२/२००७

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

हा विषय वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. जोशी अ.सु. :- डी.आय पाईप म्हणजे कोणते पाईप .

शहरअभियंता श्री. मगर एन.बी. :- डी.आय पाईप म्हणजे Ductile Iron पाईप होय.

मा.श्री. जोशी अ.सु. :- ऑफीस रिपोर्टा मध्ये आर.सी.सी.पाईपचा उल्लेख केला नाही रेंट कॉन्ट्रन्टचा करारनामा आम्हाला दिला नाही रिपोर्ट अर्धवट आहे.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं :- आपण अंदाजपत्रकाचे २५ % रक्कम पाणी पुरवठा कामी खर्च करतो आहोत. पण पाणी पुरवठा विभागा साठी स्वतंत्र इंजिनिअर नाही हे आपले दुर्देव्य आहे.

मा.श्री. जोशी अ.सु. :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने ही पाणी पुरवठा योजना आपले ताब्यात दिली तेव्हा पासून सदर खात्यास इंजि. नाही. म.जि.प्रा. ने संबंधीत पुरवठा दाराशी दराबाबत केलेला करार दाखवावा ऑ. रि. बरोबर तो नाही.

श्री.आडीगोपुळ पाणी पुरवठा विभाग :- आणून दाखवितो.

त्या प्रमाणे करारनामा दाखविण्यांत आला

मा.श्री. मैड.स.ब. :- सर्वाना अगोदर पाठवावयास हवा होता.

मा.श्री.जोशी अ.सु. :- सर्वान दिला नाही . रिपोर्ट अपूर्ण आहे.

शहर अ.श्री. मगर एन.बी. :-जीवन प्राधिकरणाने या पुरवठा दाराशी दर करार केलेले आहेत. म.न.पा.चे विविध कामासाठी टेंडर मागविले ते ४६% ने जास्तीचे आले.निविदाकाराशी वाटाघाटी केल्या असता ते एस्टी. पेक्षा २० % जादा पेक्षा कमी दरात काम करण्यास तयार नाहीत. आपण म.जि.प्राधिकरणा कडून त्यांचे दरकरारा प्रमाणे पाईप खरेदी करून आवश्यकते नुसार ठेकेदारा कडून कामे करून घेउ्र .

मा.सभापती साहेब :- मागणी आल्या नंतर खरेदी करणार का ?

शहर अभियंता श्री.मगर एन.बी. :- स्टॉक मध्ये ठेउ त्यातुन तातडीची कामे लवकर होतील.

मा.श्री. जोशी अ.सु. :- पाणी पुरवठया संबंधी सर्व कामे म.न.पा ने स्वताः डिपार्टमेटली करावीत.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- टेंडर मागवून कारावयाचे कामास उशिर होतो.आपला आठ,नउ कोटीची निधी शिल्लक आहे तेव्हा आवश्यक कामे त्वरीत व्हावीत डी.एस.आर रेट कसे ठरवितात.

शहरअभियंता श्री. मगर एन.बी. :- त्यांची कमेटी असते बाजार भाव पाहून ते दर ठरावीतात.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं :- तरीही आपण मागविलेली टेंडर ४०%,४६% अबाउ येतात. सदर पाईप खरेदी कामी जाहीर टेंडर दर मागवावे थर्ड पार्टी इन्स्पेन्शन करून खरेदी करावेत.

मा.श्री. जोशी अ.सु. :- कामाची यादी तयार आहे का? मटेरीअल कितीचे खरेदी करणार.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- म.न.पा.ने मागविलेले टेंडर अबाउ येते. सहा महिन्या पासून कामे रखडतात यास जबाबदार कोण स्थायी समितीची मिटींग अर्जट काढली. पाणी पुरवठा विभागास स्वतंत्र इंजि. नाही.

मा.श्री. जोशी अ.सु.:- आवश्यक असणारे इंजि. नेमावे अशा बाबत स्थायी समितीचा ठराव केलेला आहे. तो शासनाचे मंजूरी साठी प्रशासनाने पाठविलेला आहे.

मा.श्री. तिवारी सु.र. :- पाईप खरेदी कामीची निश्चित रक्कम दिलेली नाही. पाईप लाईन करावयाची त्या कामांची यादी नाही रिपोर्टा सोबत दर कराराची प्रत नाही.

शहर अभियंता श्री.मगर एन.बी :- कामाची यादी करून रिपोर्टा तयार केलेला नाही. सर्व शहरातील कामासाठी पाईप खरेदी करणे आहे. पाणी पुरवठा विभागास स्वतंत्र इंजि. नाही शहर अभियंता म्हणून रिपोर्टा वर सही केलेली आहे.

मा.श्री. घुले अ.ह. :- अपूर्ण माहिती आहे. मंजूरी कशाला देणार .

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- आपण मागविलेले टेंडर मधील पाईपचे दर व महाराष्ट्र जि.प्रा.ने केलेल्या रेट करारातील दर याची तुलना केलेली नाही.

मा.श्री. तिवारी सु.र. :- दरास मंजूरी दिल्या नंतर कार्यालय किती ही रकमेची खरेदी करू शकते.

मा.श्री. जोशी अ.सु. :- जिदांल कंपणीचे पाईपचे मार्केट मधील दर कमी आहेत. गणपती, झेनिथ इत्यादी अनेक पाईप उत्पादक कंपण्या आहेत.

मा.श्री. घुले अ.ह :- जाहीर निविदा मागवाव्यात दरात स्पर्धा झाली तर म.न.पा चा फायदा होईल.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं.:-कामासाठीचे आवश्यक पाईपची यादी करून जाहीर निविदा मागवाव्यात. स्थानिक बाजारपेठतुन खरेदी फायदयाची राहिल.

शहर अभियंता श्री. मगर एन.बी :- सर्व शहरातील कामासाठी पाईप खरेदी बाबत रिपोर्ट दिलेला आहे.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- गणपती स्वास्तिक झेनिथ इ.पाईप उत्पादक कंपण्या आहेत.त्या टेंडर भरतील हेच काम सहा महिन्या पूर्वी झाले असते तर कामे लवकर झाली असती पुण्याचे डी.एस आर रेट इथे वापरत नाहीत.

मा.श्री. जोशी अ.सु. :- अं.ले.प. श्री. गोरे आपण रेट करार मधील दर व बाजारातील दर यांची तुलणा केली आहे का ?

अं.ले.प. श्री. गोरे पी.आर:- रेट करार शासनाशी झालेला दर करार आहे इंजिनिअर यांनी तुलणा केली असेल.

मा.श्री. जोशी अ.सु:- आपण मार्केटचे दर पाहिले नाहीत. इतर कंपण्याचे दर पाहिले नाही. तुलणा केली नाही. आम्ही स्थायी समितीचे सदस्यांनी पांच पांच लाखाची कामे व्हावी यासाठी यादया दिल्या आहेत पण कामे लवकर होत नाहीत.

मा.श्री.त्रिपाठी सु.च ं:-आपण सभेचा अजेडा तातडीने काढला आहे. आपण कोण कोणत्या कामाचे निविदा मागविल्या आहेत. त्यांचे जादा आलेल्या दराची माहिती द्यावी मागासवर्गीय कल्याण निधीतुन सिमेंट कॉ.चे कामास मंजूरी दिली तेथील पाईप लाईन सडली आहे. ती बदलावी व नंतर सिमेंट कॉक्रीट करावे असे सांगितले तर स्थायी समितीचे मंजूरीने काम होत असल्याचे सांगीतले रस्त्यातील पाण्याची लाईन सडली का नाही हे पहाण्याचे काम इंजिनिअरचे नाही का?

मा.सभापती,साहेबः- जादा दर आलेल्या टेंडरबाबत माहिती सांगावी

त्याप्रमाणे शहर अभियंता श्री.मगर एन.बी, यांनी जादा निविदा दर आलेल्या निविदांची माहिती सभे मध्ये सांगीतली.

मा.श्री. तिवारी सु.र व मा. श्री. मैड स.ब. :- ऑफीस रिपोर्टा सोबत कामाची यादी दिलेली नसुन खरेदी करावयाच्या पाईप ची एकूण निश्चित रक्कम दिलेली नाही .

मा.श्री. घुले अ.ह.व मा.श्री. जोशी अ.सु. :- जाहीर निविदा मागवाव्यात शॅार्ट नोटीस देण्यांत यावी.

मा.श्री. शेख मुदस्सर अ.इ. :- आवश्यक कामाचे पाईपची खरेदी त्वरीत करावी.

मा.सभापती साहेब :- आपण सांगितलेल्या कामासाठी किती पाईपची गरज आहे

शहर अभियंता .श्री.मगर एन.बीः- एकूण ५३७५ रनिंग फुट पाईपची आवश्यकता आहे.

मा.श्री. घुले अ.ह.व मा.श्री. बारस्कर पो.ज :- आवश्यक पाईप खरेदी करणेस मंजूरी द्यावी.

मा.श्री. जोशी अ.सु व मा.श्री.त्रिपाठी सु.चं :- पाईप खरेदी कामी जाहीर निविदा मागविण्यांत याव्यात. आवश्यक कामांसाठी पाईप खरेदी करणे झाल्यास त्यास प्रथम स्थायी समितीची मंजूरी घेउनच खरेदी करावी.तसेच या निविदा सोबतच खोदाई व पाईप जोडणी यासाठी ही निविदा मागविण्यांत याव्यात.

शहर अभियंता श्री. मगर एन.बी. :- प्रस्ताव तयार करून पुढील कार्यवाही करणेत येईल.

मा.सभापती साहेब :- म.न.पा.चे सर्व कामीसाठी लाणगारे आवश्यक पाईप खरेदी कामी शॅार्ट नोटीस देउन जाहीर निविदा मागविण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यात येत आहे. जाहीर निविदा मागविल्या नंतर जर जादाचे दर प्राप्त झाले तर महराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दर करार असलेल्या पुरवठा दार संस्थे कडून खरेदी बाबत प्रस्ताव मंजूरी साठी मा.स्थायी समिती पुढे सादर करण्यांत यावा. म.न.पास कामांसाठी आवश्यक असणारे सी.आय/ डी.आय इत्यादी पाईप खरेदीस मा.स्थायी समितीची मंजूरी घेउनच पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या विविध ठिकाणच्या पाणी पुरवठा योजना / कामे या करिता लागणारे सी.आय./डी .आय. इत्यादी पाईप महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या दर करार असलेल्या पुरवठादार संस्थे कडून खरेदी करणेच्या धोरणात्मक निर्णयास मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट आदेशार्थ.

**ठराव :-**अहमदनगर महानगरपालिकेच्या विविध ठिकाणच्या पाणी पुरवठा योजना / कामे या करिंता लागणारे सी.आय. /डी.आय.इत्यादी पाईप महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दर करार असलेल्या पुरवठादार संस्थे कडून खरेदी करणे कामी कार्यालयाने सादर केलेल्या प्रस्तावावर सभेमध्ये झालेल्या साधक बाधक चर्चो नुसार पुढिल प्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

अहमदनगर महानगरपालिके विविध ठिकाणच्या पाणीपुरवठा योजना / कामे या करिता लागणारे निरनिराळया प्रकारचे सी.आय /डी.आय इत्यादी आय.एस.आय. मार्क कंपणी चे पाईप खरेदी कामी शॉर्ट नोटीस ने जाहीर निविदा मागविण्यांत याव्यात.

मागविण्यांत आलेले जाहीर निविदा दर हे जीवन प्राधिकरण यांचा दर करार असलेल्या पुरवठादार संस्थेच्या दरा पेक्षा जास्त दर आल्यास एस्टीमेट मंजूर असलेल्या कामा करिता जिवन प्राधिकरणाच्या दर करार असलेल्या पुरवठादार संस्थे कडून पाईप खरेदी करणे विषयी प्रस्ताव मंजूरी साठी मा.स्थायी समिती पुढे सादर करण्यांत यावा.

अहमदनगर महानगरपालिकेच्या कामांसाठी आवश्यक असणारे सी.आय/ डी.आय. इत्यादी पाईप खरेदीस मा.स्थायी समितीची मंजूरी घेउन नंतरच पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा. श्री. घुले अ.ह.

अनुमोदक :- मा.श्री.बारस्कर पो.ज.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती.
अहमदनगर महानगरपालिका.